केत्तूर विद्यालयात सायबर जनजागृती

केत्तूर : बारामती येथील विद्या प्रतिष्ठान कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय विवक हिल फाउंडेशन यांच्या विद्यमाने आयोजित सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत कार्यक्रम नेताजी सुभाष विद्यालय, केत्तूर नंबर २ (ता. करमाळा) मध्ये पार पडला. विद्या प्रतिष्ठानच्या सायबर वॉरिअर सिद्धी बाबर आणि तनुजा मसलकर यांनी सायबर सुरक्षिततेविषयी माहितीपूर्वक सादरीकरण केले. यामध्ये त्यांनी सायबर फ्रॉड म्हणजे काय? त्यापासून बचाव कसा करावा? आणि डिजिटल माध्यमातून सुरक्षित कसे राहावे? यासंबंधित विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सर्जनशीलता आणि उत्स्फूर्त सहभाग दाखवला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षितेबाबत जनजागृती निर्माण होण्यास मदत झाली. प्राचार्यांनीही या मुलींचे कौतुक केले व ही माहिती आजच्या पिढीला किती महत्त्वाची आहे, हे पटवून दिले.